# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

वाचा:— १. महाराष्ट्र शासन क्र. संकीर्ण १५१५/प्र.क्र.४४८/२०१५/६—ए दिनांक ३१/७/२०२३
२. कुलसचिव कार्यालय पत्र क्र. बीबीए/कृविके/डीसीपीएस/२०२१/२३७३ दिनांक ०८/०१/२०२१
३. विद्यापीठ आदेश क्र. बीबीए/कृविके/२०२३/१२१० जुलै २०२३
४. परिपत्रक क्र. अप्रवि/अंनिवेयो/२७०९/२०२३ दिनांक २४/०२/२०२३

अत्यंत महत्त्वाचे

जाक्रं/अप्रवि/राष्ट्र.नि.वे/ ९८३६ /२०२४
दिनांक: ०६/१२/२०२४

## परिपत्रक

या परिपत्रका व्दारे विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, सन २००५ नंतर राज्य शासनातील अधिकारी/कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे, शासनाचे नियमानुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने अंतर्गत प्रत्येक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना केन्द्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडुन नोंदणी क्रमांक उदाहरणार्थ **SGV236657F** वितरित करण्यात आलेल्या आहे.

उपरोक्त सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना केन्द्रीय देखभाल अभिकरणाच्या संकेतस्थळावरील **(www.npscra.nsdl.co.in)** वरुन **DDO login ID and password Generate** करणे अनिवार्य आहे, जेणे करुन राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली हताळणे शक्य होईल व त्या संदर्भात कामात गती प्रदान होईल. काही तांत्रीक अडचण असल्यास राष्ट्रीय निवृत्ती वेतन कक्ष, नियंत्रक डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

तसेच अकोला व नागपुर वेतन व लेखाधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की, प्रत्येक महीन्याचे वेतन देयक पारित झाल्याचे दिनांका पासुन ८ दिवसाचे आत राष्ट्रीय निवृत्ती वेतनाचे मासीक वर्गणीचे धनादेश व विवरण पत्र राष्ट्रीय निवृत्ती वेतन कक्ष, नियंत्रक डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे कार्यालयात पाठविण्यात यावे, राष्ट्रीय निवृत्ती वेतनाचे मासीक वर्गणी उशीर जमा केल्यास केन्द्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचे दिशा निर्देशाप्रमाणे संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन व्याजाची रक्कम वसुल करण्या संबंधी कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपी:—

१. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व).
३. मा. कुलगुरूंचे स्विय सहायक, मा. कुलगुरू डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरिता सादर.
४. वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना माहितीकरीता.
५. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.